**जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत टंचाईमुक्त करण्यासाठी सन २०१६-१७ पासून पुढील कालावधीत निवडण्यात येणा-या गावांपैकी शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमधील निवडण्यात आलेल्या गावांमध्ये Gap Funding करीता मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून निधी उपलब्ध करून देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः जशिअ-२०१६/प्र.क्र.०१/जल-७**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २५ फेब्रुवारी, २०१६

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय क्रमांकः जलअ-२०१४/प्र.क्र. २०३/जल-७ दिनांक ०५ डिसेंबर, २०१४
२) शासन निर्णय क्रमांकः जलअ-२०१४/प्र.क्र. २०३/जल-७ दिनांक २८ जानेवारी, २०१५
३) शासन निर्णय क्रमांकः जलअ-२०१४/प्र.क्र. २०३/जल-७ दिनांक ०३ मार्च, २०१५

<u>प्रस्तावना -</u>

१. टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ या कार्यक्रमाचा भाग म्हणून राज्यात जलयुक्त शिवार अभियान, हा अत्यंत महात्वाकांक्षी Flagship कार्यक्रम सन २०१५-१६ पासून राबविण्यात येत असून, सदर अभियानांतर्गत सन २०१५-१६ पासून दरवर्षी ५,००० गावे यानुसार पुढील ५ वर्षात २५,००० गावे टंचाईमुक्त करण्याचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे.

२. या अभियानाअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये टंचाईमुक्त करण्यासाठी राज्यात एकूण ६२०२ गावांची निवड करण्यात आलेली आहे. या निवड करण्यात आलेल्या गावांमध्ये सन २०१५ मधील पावसाळा सुरु होईपर्यंत पहिल्या टप्यामध्ये मोठ्याप्रमाणात जलसंधारणाची/मृदसंधारणाची कामे करण्यात आली. तथापि, निवडण्यात आलेल्या गावांमधील पाण्याच्या ताळेबंदाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कृती आराखड्यानुसार प्रस्तावित करण्यात आलेली सर्व कामे पुर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला निधी व सर्व निधी स्त्रोतामधून / अभिसरणाद्वारे उपलब्ध होणारा निधी विचारात घेतल्यास सरासरी कृती आराखड्यानुसार आवश्यक असलेल्या एकूण रकमेच्या सुमारे ३०% ते ४०% रक्कम प्रती गाव तुट असल्याचे निदर्शनास आले आहे, सदर तुटीची रक्कम सीएसआर / लोकसहभागाच्या माध्यमातुन उपलब्ध करण्याचे प्रस्तावित असले, तरी या माध्यमातुन देखील मोठ्या प्रमाणात असलेली तुटीची रक्कम भरून निघत नाही, असे देखील दिसुन आलेले आहे.

३. मा. मुख्यमंत्री महोदयांनी आपल्या वाढदिवसाच्या दिवशी केलेल्या आवाहनास अनुसरून अनेक नागरीक, संस्था यांनी जलयुक्त शिवार योजनेसाठी व दुष्काळ निवारण करण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देणग्या दिलेल्या आहेत. ही सर्व रक्कम मिळुन साधारणपणे रू. ६०.०० कोटी इतका निधी मुख्यमंत्री सहाय्यता निधी खात्यात जमा झालेला आहे.

४. सर्वसाधारणपणे देणगी दारांची अशी अपेक्षा असते की, त्यांनी दिलेल्या देणगीचा प्रत्यक्ष लाभार्थ्यास लाभ व्हावा व दुष्य स्वरूपात परिणाम दिसावा. नागरीकांची सदर अपेक्षा वाजवी असून, शासनाने नागरीकांनी देवु केलेल्या देणग्यातुन विशिष्ट कामे हाती घेतल्यास, नागरीकांचा शासनावरील विश्वास वृध्दीगंत होण्यास मदत होणार आहे. सबब जलयुक्त शिवार योजनेच्या गावांमधील आत्महत्याग्रस्त गावांच्या बाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

**शासन निर्णय -**

१. जलयुक्त शिवार अभियान योजनेच्या अंमलबजावणीचा अनुभव लक्षात घेता टंचाईमुक्त करण्यासाठी निवडण्यात आलेल्या गावांच्या सर्वसाधारणपणे तयार करण्यात आलेल्या डिपीआर पैकी ६०-७०% कामांच्या अंमलबजावणीसाठी सर्व योजनांच्या एकत्रीकरणातून (convergence) निधी उपलब्ध होतो मात्र उर्वरित ३०-४०% डीपीआर निधी अभावी अंमलात येत नाही. सबब जलयुक्त शिवार अभियानांतर्गत टंचाईमुक्त करण्यासाठी निवडण्यात आलेल्या गावामधील आत्महत्याग्रस्त गावांचा कृतीआराखडा १००% अंमलात येण्याकरिता Gap Funding करीता मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून निधी उपलब्ध करुन १००% कृती आराखडा अंमलात आणण्यात यावा.

२. जलयुक्त शिवार योजनेमध्ये गावे निवडताना शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या गावांची निवड करण्याच्या निकषाचा समावेश करण्याबाबत या पूर्वीच निर्णय घेण्यात आलेला असून त्या बाबतचे आदेश दि.१४ ऑगस्ट,२०१५ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत. प्रस्तुत १४ आत्महत्याग्रस्त जिल्हयातील ज्या गावांमध्ये गेल्या ५ वर्षात शेतकऱ्यांनी नापिकीस कंटाळून आत्महत्या केल्याच्या सर्वाधिक घटना घडल्या आहेत, अशा सुमारे २५ ते ३० गावांची निवड करून अशा गावांच्या करण्यात आलेल्या कृती आराखड्यानुसार येणारी गॅप फडींगची रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातुन उपलब्ध करुन देण्यात यावी व पुढील वर्षभरात जलसंधारणाची/मृदसंधारणाची कामे हाती घेवुन ती वर्ष अखेरपर्यंत पुर्ण करुन गावे पुर्णत: दुष्काळमुक्त करण्यात यावीत.

३. जलयुक्त शिवार अभियानाकरीता शासन निर्णय दिनांक ५ डिसेंबर, २०१४ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीकडे या कामाच्या सनियंत्रणाची जबाबदारी देण्यात येत असून प्रस्तुत समितीमध्ये अशा निवड करण्यात आलेल्या आत्महत्याग्रस्त गावांमध्ये अभियान राबविण्याची रुपरेषा ठरविण्यासाठी कृषि विभाग, आरोग्य विभाग व इतर तंज्ञ व्यक्तींचा समावेश करण्याचे अधिकार संबंधीत जिल्हाधिकारी यांना देण्यात येत आहेत. अशा गावांमधील कामे नाविण्यपुर्ण व Knowledge Driven असावीत.

४. शासन निर्णय जलसंधारण विभाग क्र.जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७ दि. २८ जानेवारी, २०१५ अन्वये पालकमंत्री, यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या आढावा व सनियंत्रण समितीने अशा आत्महत्याग्रस्त गावांमधील कामांचे नियोजन व सनियंत्रण समितीने अशा आत्महत्याग्रस्त गावांमधील कामांचे नियोजन व सनियंत्रण याकडे विशेष लक्ष द्यावे व एक वर्षाच्या कालावधीत सर्व कामे प्राथमिकतेने पुर्ण करण्यात यावेत.

५. जिल्हाधिकारी यांनी अशा आत्महत्याग्रस्त कुंटूंबांचा शोध घेऊन त्यांची निवड केल्यानंतर अशा कुंटुंबांतील मुलांच्या शैक्षणिक गरजा, स्वंयम रोजगाराच्याबाबी, शेती व त्याच बरोबर पुरक व्यवसायासाठी मदत, याकरीता CSR च्या माध्यमातून निधीची उपलब्धता याचा एकत्रित विचार Package स्वरुपात मदत करण्याबाबत जिल्हास्तरीय समितीच्या माध्यमातून निर्णय घ्यावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२२५१६२०३९७१२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vinod S Wakhare

Digitally signed by Vinod S Wakhare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8f4277e1c48d95adb75a5d959bbb8f12b61892a0bf91d9d7250d0bfd4f204c77, cn=Vinod S Wakhare
Date: 2016.02.26 16:23:24 +05'30'

( वि. सि. वखारे )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१.मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३.मा सभापती विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंड्ळ सचिवालय यांचे सचिव
४. मा अध्यक्ष विधान सभा, महाराष्ट्र विधानमंड्ळ सचिवालय यांचे सचिव
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधान परिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. सर्व सन्माननीय विधानसभा/ विधान परिषद व संसद सदस्य.
७. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
८. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
९. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
१०. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव , मंत्रालय, मुंबई.
११. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
१२. सर्व विभागीय आयुक्त
१३. संचालक (मृदसंधारण), कृषि आयुक्तालय, पुणे
१४. मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे.
१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता).
१६. सर्व जिल्हाधिकारी
१७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद
१८. महालेखापाल ½, महाराष्ट्र राज्य , मुंबई/ नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता).
१९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२०. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
२१. सर्व उपायुक्त (विकास) , विभागीय आयुक्त कार्यालय,

२२. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२३.सर्व अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ,
२४. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
२५.सर्व कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण)
२६.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२७. सर्व मंत्रालयीन विभाग
२८.सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, ग्रा. वि. व ज. सं. विभाग
२९.नियोजन विभाग /वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३०.कार्यासन जल-११ ग्रा. वि. व ज. सं. विभाग मंत्रालय, मुंबई.
३१.जल-७, निवड नस्ती.